**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२५१**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २३ डिसेंबर, २०१६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या २५१व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२३/१२/१६
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस,<br>वरळी, मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री. एन्. व्ही. मेराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०२५. | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

..२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xox----------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २५१वी बैठक

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **२५ नोव्हेंबर, २०१६ (शुक्रवार)** |
| **वेळ** | : | **दुपारी १२.०० वाजता** |
| **स्थळ** | : | **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय,<br>मुंबई — ४०० ०३२** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री.अजोय मेहता<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.भूषण गगराणी<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको, | - | सदस्य |
| श्री.यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्रीमती वंदना कृष्णा
प्रधान सचिव,
(अपर मुख्य सचिव यांचे प्रतिनिधी),
वित्त विभाग

श्री. प्रविण दराडे
अति.महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..२/-

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्र. द. ममदापुरे
प्रमुख,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती विजयालक्ष्मी
प्रमुख,
परिवहन व दळणवळण विभाग व
संचालक (प्रकल्प), मेट्रो (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. टी. ठुबे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह-प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप-महानगर आयुक्त (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव,
कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..३/-

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती तसेच इतर सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

बाब क्र.१ : **प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या २५०व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करताना कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, कार्यवृत्तामधील बाब क्र.८ मधील परिच्छेद क्र.८.६ मध्ये **"मान्य करुन"** हे शब्द वगळण्यात यावेत.

उपरोक्त दुरुस्तीसह कार्यवृत्त कायम करण्यात आले.

बाब क्र.२ : **प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या २५०व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

बाब क्र.३ : **मुंबई पारबंदर प्रकल्पाकरीता सल्लागाराची (General Consultant) नेमणूक करणेसाठी मान्यता देणेबाबत.**

३.१ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, जायकाने या प्रकल्पाच्या सर्वेक्षणाकरीता सल्लागार नियुक्त करून सदर प्रकल्पाकरीता कर्ज देण्याबाबत व्यवहार्यता तपासण्याकरीता एप्रिल, २०१५ ते नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत प्रकल्पाचे सर्वेक्षण केले. सर्वेक्षणाअंती जायकाच्या सल्लागाराकडून प्रकल्पाचे अंदाजपत्रक बनविण्यात आले असून प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत रु.१७,८४३ कोटी इतकी निश्चित केली आहे. सदर प्रकल्पाकरीता जायकाने सल्लागाराच्या नियुक्तीकरीता विहीत केलेल्या निवड प्रक्रियेनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजीच्या निविदा सूचनेद्वारे सुयोग्य अनुभव व पात्रता असणाऱ्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या सल्लागारांकडून स्वारस्याचे प्रस्ताव (Expression of

Interest) मागविले. प्रस्ताव सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत (१० मार्च, २०१६) ७ सल्लागारांनी / सल्लागारांचा चमूंनी (Firm /Consortia /JV) स्वारस्याचे प्रस्ताव सादर केले:-

१. एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग)- पडेको कंपनी लि.(जपान) - दार-अल-हंदाश(लेबनॉन) - टी.वाय. लिन इंटरनॅशनल (अमेरीका)

२. सीएच२एम हिल इंटरनॅशनल लिमिटेड (अमेरीका)

३. कोवी ए/एस (डेन्मार्क)

४. ओरीएन्टल कन्स्ल्टन्टस् ग्लोबल कंपनी लि.(जपान) - निप्पॉन कोई कंपनी लि.(जपान) - इजिस स्ट्रक्चर्स ॲण्ड एन्व्हायरनमेंट (फ्रान्स) - निप्पॉन इंजिनियरींग कन्सल्टंटस कंपनी लि.(जपान)

५. योशीन इंजिनियरींग कॉर्पोशन (कोरीया) - युंगवा इंजिनियरींग कन्सल्टंटस लि.(कोरीया) - स्टुप कन्सल्टंटस (पी) लिमिटेड (भारत) - वाडीया टेक्नोइंजिनियरींग सर्व्हिसेस लिमिटेड (भारत)

६. टाटा कन्सल्टींग इंजिनियर्स लि.(भारत) - हिल इंटरनॅशनल एन.व्ही. (नेदरलँड्स) - स्विको इंटरनॅशनल एबी (स्विडन) - कोबा कन्सल्टंट्स ॲण्ड इंजिनियर्स (पोर्तुगल)

७. वॅप्कॉस लि. (भारत)

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्थापन केलेल्या निविदा मूल्यांकन समितीने (Bid Evaluation Committee) स्वारस्य प्रस्तावांच्या निविदेतील निकषांच्या आधारे प्राप्त देकार प्रस्तावांची छाननी केली. त्यानुसार प्राप्त झालेल्या ७ सल्लागारांच्या / सल्लागारांच्या चमूच्या प्रस्तावांपैकी खालील ४ सल्लागार / सल्लागारांचे चमू पूर्वअर्हताप्राप्त ठरले :-

१. एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग)- पडेको कंपनी लि.(जपान) - दार-अल-हंदाश(लेबनॉन) - टी.वाय. लिन इंटरनॅशनल (अमेरीका)

२. कोवी ए/एस (डेन्मार्क)

३. ओरीएन्टल कन्सल्टंटस ग्लोबल कंपनी लि.(जपान) - निप्पॉन कोई कंपनी लि.(जपान) - इजिस स्ट्रक्चर्स ॲण्ड एन्व्हायरनमेंट (फ्रान्स) - निप्पॉन इंजिनियरींग कन्सल्टंटस कंपनी लि.(जपान)

४. योशीन इंजिनियरींग कॉर्पोशन (कोरीया) - युंगवा इंजिनियरींग कन्सल्टंटस लि.(कोरीया) - स्टुप कन्सल्टंटस (पी) लिमिटेड (भारत) - वाडीया टेक्नोइंजिनियरींग सर्विसेस लिमिटेड (भारत)

वरीलप्रमाणे पूर्वअर्हतेबाबत जायकाची सहमती प्राप्त झाल्यानंतर पूर्वअर्हताप्राप्त ४ सल्लागारांना / सल्लागारांच्या चमूंना निविदा प्रपत्रे (Request For Proposal - RFP) देण्यात आली.

३.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, या प्रकल्पाच्या सल्लागाराच्या कामाच्या वावाअंतर्गत, प्रकल्पाच्या विविध भागांकरीता (Packages) निविदा प्रपत्रांतील सर्व तांत्रिक, आर्थिक व कायदेविषयक बाबी तपासून निविदा प्रपत्रे अंतिम करणे, निविदा प्रक्रियेमध्ये निविदापूर्व बैठक इ. मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सहाय्य करणे, प्राप्त निविदांची छाननी करणे, छाननीअंती प्रकल्पाच्या विविध भागांकरीता कंत्राटदारांच्या नियुक्तीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सहाय्य करणे, प्रकल्पाच्या बांधकामास आवश्यक त्या विविध परवानग्या प्राप्त करण्याकरीता संबंधित सरकारी, निमसरकारी तसेच खाजगी आस्थापनांशी समन्वय साधणे व पाठपुरावा करणे, कंत्राटदाराने तयार केलेली प्रकल्पाची सविस्तर संकल्पचित्रे तपासणे, प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान प्रत्यक्ष कामावर देखरेख करणे व कामाच्या गुणवत्तेची निकषांनुसार खातरजमा करणे या व अन्य कामांचा समावेश आहे.

३.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही नमूद केले की, वरीलप्रमाणे ४ सल्लागार / सल्लागारांच्या चमूंपैकी कोवी ए/एस (डेन्मार्क) यांनी, प्रकल्पाकरीता निविदा भरणाऱ्या बांधकाम कंत्राटदार चमूसोबत काम करण्याचा निर्णय घेतला असल्याने निविदा प्रक्रियेत भाग घेऊ शकणार नाही असे त्यांच्या दिनांक २६ जुलै, २०१६ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. त्यामुळे सल्लागारांचे ३ चमूंनी निविदा प्रक्रियेत भाग घेतला. परंतु मे.योशीन इंजिनियरींग कॉर्पोशन (कोरीया) - युंगवा इंजिनियरींग कन्स्ल्टन्टस् लि.(कोरीया) - स्टुप कन्स्ल्टन्टस् (पी) लिमिटेड (भारत) - वाडीया टेक्नोइंजिनियरींग सर्व्हिसेस लिमिटेड (भारत) या सल्लागार-चमूने विहीत वेळेत त्यांचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर पूर्णपणे अपलोड केला नाही. अशारितीने, निविदा प्राप्त

..६/-

होण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत (२३ ऑगस्ट, २०१६) सल्लागारांच्या खालील २ चमूंकडून निविदा प्राप्त झाल्या:-

१. एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग)- पडेको कंपनी लि.(जपान) - दार-अल-हंदाश(लेबनॉन) - टी.वाय. लिन इंटरनॅशनल (अमेरीका)

२. ओरीएन्टल कन्स्ल्टन्टस् ग्लोबल कंपनी लि.(जपान) - निप्पॉन कोई कंपनी लि.(जपान) - इजिस स्ट्रक्चर्स ॲण्ड एन्व्हायरनमेंट (फ्रान्स) - निप्पॉन इंजिनियरींग कन्स्ल्टन्टस् कंपनी लि.(जपान)

३.५ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्थापन केलेल्या निविदा मूल्यांकन समितीने (Bid Evaluation Committee) निविदा प्रपत्रांतील निकषांच्या आधारे प्राप्त देकार प्रस्तावांची छाननी केली. यामध्ये निविदाकारांच्या तांत्रिक व आर्थिक प्रस्तावांच्या (Technical & Financial proposals) छाननीचा अंतर्भाव होता. निविदाकारांच्या तांत्रिक प्रस्तावांच्या छाननीअंती सल्लागारांच्या चमूंना प्राप्त झालेले गुण पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | सल्लागार / संस्था | प्राप्त झालेले तांत्रिक गुण |
|---|---|---|
| १ | एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग)- पडेको कंपनी लि.(जपान) - दार-अल्-हंदाश(लेबनॉन) - टी.वाय.लिन इंटरनॅशनल (अमेरीका) | ८९.५१ |
| २ | ओरीएन्टल कन्स्ल्टन्टस् ग्लोबल कंपनी लि.(जपान) - निप्पॉन कोई कंपनी लि.(जपान) - इजिस स्ट्रक्चर्स ॲण्ड एन्व्हायरनमेंट (फ्रान्स) - निप्पॉन इंजिनियरींग कन्स्ल्टन्टस् कंपनी लि.(जपान) | ७२.१९ |

३.६ जायकातर्फे सदर तांत्रिक गुणांकन प्रक्रियेस दिनांक १५ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या पत्राद्वारे सहमती प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त २ सल्लागार चमूंचे आर्थिक देकार उघडण्यात आल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले. एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग)- पडेको कंपनी लि.(जपान) - दार-अल-हंदाश(लेबनॉन) - टी.वाय. लिन इंटरनॅशनल (अमेरीका) या चमूने सेवाकर वगळून रु. २५७,१४,९९,५९१/- इतका आर्थिक देकार सादर केला असून ओरीएन्टल कन्स्ल्टन्टस् ग्लोबल कंपनी लि.(जपान) - निप्पॉन कोई कंपनी लि.(जपान) - इजिस स्ट्रक्चर्स ॲण्ड एन्व्हायरनमेंट (फ्रान्स) - निप्पॉन इंजिनियरींग कन्स्ल्टन्टस् कंपनी लि.(जपान) या चमूचा आर्थिक

देकार सेवाकरासहीत रु. ५६३,७६,४०,३५३/- इतका आहे. ओरीएन्टल कन्स्ल्टन्टस् ग्लोबल कंपनी लि.(जपान) - निप्पॉन कोई कंपनी लि.(जपान) - इजिस स्ट्रक्चर्स ॲण्ड एन्व्हायरनमेंट (फ्रान्स) - निप्पॉन इंजिनियरींग कन्स्ल्टन्टस् कंपनी लि.(जपान) या चमूचा आर्थिक देकार सेवाकर वगळून रु. ५२१,१२,३९,९०१/- इतका येतो.

३.७ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, निविदेत समाविष्ट तरतुदीनुसार ९०:१० या गुणोत्तरानुसार सल्लागार चमूंचे तांत्रिक व आर्थिक गुणांवरून एकत्रित गुण देण्यात आले. निविदेतील तरतूदींनुसार सल्लागाराने देकारामध्ये नमूद केलेल्या मनुष्यबळ व परकीय चलन या बाबी लक्षात घेऊन सल्लागाराचा मूल्यांकित आर्थिक देकार (Evaluated Total Price - ETP) गणण्यात येतो. त्यानुसार सल्लागारांचे मूल्यांकित आर्थिक देकार पुढीलप्रमाणे आहेत. हे मूल्यांकित आर्थिक देकार हे केवळ निविदांच्या एकत्रित मुल्यांकनासाठी (Combined Evaluation of Bids) असून यामुळे सल्लागाराच्या आर्थिक देकारात बदल होत नाही. यानुसार सल्लागारांच्या चमूंना प्राप्त झालेल्या तांत्रिक, आर्थिक व एकत्रित गुणांचे विवरण पुढीलप्रमाणे आहे :-

| **निविदेतील निकषांनुसार केलेले मूल्यमापन** | **एकूण गुण** | **प्राप्त गुण** | |
|---|---|---|---|
| | | एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग)- पडेको कंपनी लि.(जपान) - दार-अल-हंदाश(लेबनॉन) - टी.वाय. लिन इंटरनॅशनल (अमेरीका) | ओरीएन्टल कन्स्ल्टन्टस् ग्लोबल कंपनी लि.(जपान) - निप्पॉन कोई कंपनी लि.(जपान) - इजिस स्ट्रक्चर्स ॲण्ड एन्व्हायरनमेंट (फ्रान्स) - निप्पॉन इंजिनियरींग कन्स्ल्टन्टस् कंपनी लि.(जपान) |
| तांत्रिक गुण ($S_t$) | **१००** | ८९.५१ | ७२.१९ |
| मूल्यांकित आर्थिक देकार (रु.) (Evaluated Total Price - ETP) | | २५७,१४,९९,५९१/- | ५२१,१२,३९,९०१/- |
| सुधारीत आर्थिक गुण ($S_f$) | **१००** | १०० | ४९.८ |
| **$S_t$ x T (T =०.९)** | | ८०.५६ | ६४.९७ |
| **$S_f$ x P (P =०.१)** | | १०.०० | ४.९८ |
| एकत्रित गुण **(S) = $S_t$ x T + $S_f$ x P** | | ९०.५६ | ६९.९५ |
| **शेरा** | | **सर्वोच्च एकत्रित गुण** | - |

वरीलप्रमाणे एकत्रित मूल्यांकन अहवाल जायकाला सहमतीकरीता पाठविण्यात आला आहे.

३.८ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, याप्रमाणे एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग)- पडेको कंपनी लि.(जपान) - दार-अल-हंदाश(लेबनॉन) - टी.वाय. लिन इंटरनॅशनल (अमेरीका) या सल्लागार चमूने निविदेतील तरतुदीनुसार सर्वात जास्त एकत्रित गुण प्राप्त केले असून त्यांचा आर्थिक देकार रु.२५७,१४,९९,५९१/- (रुपये दोनशे सत्तावन्न कोटी चौदा लक्ष नव्व्याण्णव हजार पाचशे एक्याण्णव फक्त) (सेवाकर वगळून) हा जायकाने अंदाजित केलेल्या प्रकल्पाच्या बांधकाम किंमतीच्या (रु. १२,९७३ कोटी) सुमारे १.९८% इतका आहे. जायकाच्या सल्लागाराने प्रकल्पाकरीता तयार केलेल्या अंदाजपत्रकामध्ये सल्लागाराची फी रु.३७७ कोटी इतकी अपेक्षित केली असून ती प्रकल्पाच्या बांधकाम अंदाजित किंमतीच्या २.९% इतकी होती. ही बाब लक्षात घेता एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग)- पडेको कंपनी लि.(जपान) - दार-अल-हंदाश(लेबनॉन) - टी.वाय. लिन इंटरनॅशनल (अमेरीका) या सल्लागार चमूचा आर्थिक देकार योग्य वाटतो असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

३.९ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्वात जास्त एकत्रित गुण प्राप्त केलेल्या सल्लागाराच्या चमूमधील सदस्य सल्लागारांना समकक्ष कामांच्या असलेल्या अनुभवाबाबत विचारणा केली. याबाबत एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग) ही जगातील एक उत्तम तज्ञ सल्लागार असून सध्या मुंबईतील मेट्रो-३ प्रकल्पाकरीता नियुक्त सल्लागार चमूचा एक सदस्य असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले. अतिरिक्त महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी समितीच्या असे निदर्शनास आणले की, एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग) यांना बांगलादेशातील पद्मा मल्टिपर्पज ब्रिज (एकूण लांबी १३.६ कि.मी., पाण्यावरील लांबी ६.१५ कि.मी.) , चीनमधील पेनांग सेकंड ब्रिज (एकूण लांबी २४ कि.मी., पाण्यावरील लांबी १७ कि.मी.) या व अशा अन्य मोठ्या पुलांच्या कामांचा अनुभव आहे. त्याचप्रमाणे दार-अल-हंदाश यांना मुंबईतील वांद्रे-वरळी सागरी सेतू तसेच जे.जे. उड्डाणपूल या कामांचा अनुभव असल्याचेही समितीच्या निदर्शनास आणण्यात आले.

३.१० महानगर आयुक्त यांनी वरील बाबी लक्षात घेता एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग)- पडेको कंपनी लि.(जपान) - दार-अल-हंदाश(लेबनॉन) - टी.वाय. लिन इंटरनॅशनल (अमेरीका) या सल्लागार चमूची निविदा स्विकारण्यास मान्यता देण्याची कार्यकारी समितीस विनंती केली.

..९/-

<u>निर्णय : त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>

<u>ठराव क्र. १३१४ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे "मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून एइकॉम एशिया कंपनी लि.(हाँगकाँग)- पडेको कंपनी लि.(जपान) - दार-अल-हंदाश (लेबनॉन) - टी.वाय. लिन इंटरनॅशनल (अमेरीका) या चमूची (consortium) निविदेतील तरतुदीनुसार सर्वात जास्त एकत्रित गुण प्राप्त करणारी निविदा त्यांच्या रु.२५७,१४,९९,५९१/- (रुपये दोनशे सत्तावन्न कोटी चौदा लक्ष नव्याण्णव हजार पाचशे एक्याण्णव फक्त) अधिक निविदेतील तरतूदीनुसार देय असणारा सेवा कर या आर्थिक देकारासह स्विकारण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.४ :</u> <u>मेट्रो मार्ग-२ ब आणि ७ करीता रेल्वेचे डब्बे (Rolling Stock), संकेत व दूरसंचार (Signalling & Telecomunication) करीता पुरवठा, अंमलबजावणी आणि सुरुवात करण्याकरीता DMRC यांना Deposit Works देण्याबाबत.</u>**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीत तसेच दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत, मुंबई मेट्रो मार्गांची पुढील ३ ते ४ वर्षात खालील तक्यात नमूद केलेल्या ११८ कि.मी लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरीत अंमलबजावणी करण्याकरीता रु.३५,४०० कोटीस (रु.३०० कोटी प्रति कि.मी. प्रमाणे) प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

**त्वरित अंमलबजावणी करण्यात येणारे संभाव्य उन्नत मेट्रो मार्ग खालीलप्रमाणे आहेत :-**

| मार्गिकांची नावे | लांबी | प्रकल्पाची अंदाजीत किंमत (कोटी) |
|---|---|---|
| • दहिसर (प) - डी.एन.नगर<br>• डी.एन.नगर - वांद्रे - मानखुर्द | १८ कि.मी<br>२३ कि.मी | ८१००<br>३९०० |
| • वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे - कासारवडवली<br>• वडाळा - मुख्य डाक कार्यालय (GPO) - आर.ए. किडवाई रोड मार्ग | ३२ कि.मी<br>८ कि.मी | ६६०० + ३०००<br>२४०० |
| • दहिसर (पू) - अंधेरी (पू)<br>• अंधेरी (पू) - वांद्रे (पू) | १७ कि.मी<br>०९ कि.मी | ५४००<br>२७०० |
| • जोगेश्वरी - विक्रोळी लिंक रोड | ११ कि .मी | ३३०० |
| **एकूण** | **११८ कि.मी.** | **३५,४००/-** |

४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग - २अ दहिसर (पूर्व) - डी. एन. नगर (१८.६ कि.मी.) आणि मेट्रो मार्ग - ७ अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व) (१६.५ कि.मी) या प्रकल्पांना शासनाची मान्यता मिळाली आहे. मेट्रो मार्ग - २अ दहिसर (पूर्व) - डी. एन. नगर या प्रकल्पाची अंमलबजावणी (Deposit Work) या तत्वावर दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (DMRC) मार्फत आणि मेट्रो मार्ग ७ - अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व) ची अंमलबजावणी मुं.म.प्र.वि.प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. मेट्रो मार्ग - ७ आणि २अ या दोन्ही मार्गाकरीता स्थापत्य कामासाठी कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आली असून दोन्ही कामे प्रगतीपथावर असून २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे.

४.३ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या २४६ व्या बैठकीत मान्यता घेऊन मेट्रो मार्ग २अ ची अंमलबजावणी करण्याचे काम Deposit Terms वर DMRC यांना अंदाजित प्रकल्प पुर्णत्वाच्या किंमतीच्या ६% + सेवाकर म्हणजेच रु.३३३.९७ कोटी + सेवाकर एवढया किंमतीवर देण्यात आले आहे, ज्यामध्ये स्थापत्य बांधकाम, सर्व प्रणाली जसे की, रेल्वेचे डब्बे, संकेत तथा दूरसंचार, वीज पुरवठा आणि संकर्षण तसेच स्वयंचलीत भाडे आकारणी इ. चा पुरवठा, अंमलबजावणी आणि सेवा सुरुवात करणे अंतर्भूत आहे. मेट्रो मार्ग -७ चे स्थापत्य बांधकाम मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामार्फत होणार

..११/-

असून मेट्रो मार्ग -७ आणि २अ मध्ये आंतरसमन्वय साधण्यासाठी स्थापत्य बांधकामाच्या कंत्राटामध्ये आवश्यक तो बदल करण्यात आला असून या दोन्ही मेट्रो मार्ग २अ आणि ७ मध्ये गाडयांची interoperability संभव झाली आहे.

४.४ महानगर आयुक्त यांनी विषद केले की, दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी मेट्रो मार्ग २ दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा २ (ब) - डी.एन.नगर - मंडाळे या मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल फेब्रुवारी २०१६ ला प्राधिकरणास सादर केला. सदर अहवालास दिनांक २१ मार्च, २०१६ झालेल्या प्राधिकरणाच्या १३९ व्या बैठकीत मान्यता मिळाली असून मंत्रिमंडळाने दिनांक २० सप्टेंबर २०१६ रोजी अंमलबजावणीस मान्यता दिली आहे. मेट्रो मार्ग -२ब - डी.एन.नगर - मंडाळे या प्रकल्पाच्या पूर्णत्वाची **एकूण किंमत रु. १०,९८६ कोटी** एवढी अंदाजित आहे.

४.५ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग २अ, २ब आणि ७ मध्ये गाडयांची अदलाबदली (interoperability) होणार असून पूर्णत: एकच मार्ग होऊ शकेल. या तिन्ही मार्गांकरीता संकेत तथा दूरसंचार प्रणाली एकच राहणे गरजेचे असून तसेच आर्थिकदृष्टया फायद्याचे असून रेल्वे डब्बे व संकेत तथा दूरसंचार प्रणालीचे काम DMRC ला देण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे मेट्रो २ब मार्ग (डि.एन.नगर - मंडाळे) हा मेट्रो मार्ग २/२अ चा भाग असल्यामुळे, प्राधिकरणाने दिनांक २२ एप्रिल, २०१६ च्या पत्रान्वये दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ यांना कळविले की, मेट्रो २ब आणि ७ याकरीता लागणारे रेल्वेचे डब्बे आणि संकेत तथा दूरसंचार प्रणालींचा पुरवठा, अंमलबजावणी आणि सेवा सुरुवात करणे याकरीता deposit term तत्वावर घेण्याबाबत सूचना केली व त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यास सांगितले. त्यास अनुसरुन DMRC यांनी दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी मेट्रो मार्ग २ब आणि ७ करीता रेल्वेचे डब्बे व संकेत तथा दूरसंचार प्रणालींचा पुरवठा, अंमलबजावणीसाठी प्रस्ताव प्राधिकरणास सादर केला.

४.६ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिल्ली मेट्रो महामंडळ मर्यादित यांचा मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा अनुभव पाहता तसेच भारत सरकार आणि दिल्ली सरकार यांचा संयुक्त उपक्रम असल्याने मेट्रो मार्ग २ब व ७ करीता लागणारे रेल्वेचे डब्बे (Rolling Stock) व संकेत तथा दूरसंचार (Signalling & Telecommunication) प्रणाली पुरवठा/ खरेदी, अंमलबजावणी आणि सेवा सुरुवात करणे यासाठी DMRC यांना एकमेव स्त्रोत तत्वावर

Deposit work on cost plus percentage या तत्वावर एकूण पूर्णत्वाची किंमत रु.५६६९ कोटीच्या (जमीन खर्च, आराखडा खर्चासहित सामान्य खर्च, पुनर्वसन व पुनर्वसाहत (R&R) इ. खर्च वगळून) ६% म्हणजेच रु.३४०.१४ कोटी + सेवाकर इतक्या किंमतीवर नेमणूक करण्यास मान्यता द्यावी.

४.७ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली की, सदर कामाच्या व्याप्तीकरीता ६% एवढी फी आहे का? यावर महानगर आयुक्त यांनी माहिती दिली की, मेट्रो मार्ग-२ अ प्रमाणे एकूण पूर्णत्व किंमतीच्या ६% + सेवाकर किंमतीवर Deposit Work on Cost plus percentage फी आकारण्यात येत आहे.

**निर्णय:** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने खालील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३१५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे दिल्ली मेट्रो महामंडळ मर्यादित यांचा मेट्रो प्रकल्पाचा अंमलबजावणीचा अनुभव पाहता तसेच भारत सरकार आणि दिल्ली सरकार यांचा संयुक्त उपक्रम असल्याने मेट्रो मार्ग २ब व ७ करीता लागणारे रेल्वेचे डब्बे (Rolling Stock) व संकेत तथा दूरसंचार (Signalling & Telecommunication) प्रणाली पुरवठा/खरेदी, अंमलबजावणी आणि सेवा सुरुवात करणे (मार्ग वाहतूकीसाठी खुला करणे) यासाठी DMRC यांना एकमेव स्त्रोत तत्वावर Deposit work on cost plus percentage या तत्वावर एकूण पूर्णत्वाची किंमत रु.५६६९ कोटीच्या (जमीन खर्च, आराखडा खर्चासहित सामान्य खर्च, पुनर्वसन व पुनर्वसाहत (R&R) इ. खर्च वगळून) ६% म्हणजेच रु.३४०.१४ कोटी + सेवाकर इतक्या किंमतीवर नेमणूक करण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ (अ):** **प्राधिकरणाचे दिनांक ३० जून, २०१६ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २०१६ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय :** **प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**बाब क्र.५ (ब):** **प्राधिकरणाचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय :** **प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**बाब क्र.६ :** **प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक ०१ जुलै, २०१६ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१६**

दिनांक ०१ जुलै, २०१६ ते ३० सप्टेंबर, २०१६ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विविध बँका / वित्तीय संस्था यामध्ये केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय :** **सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**********